महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१. ☏-२२६२०२३१/३२

**क्रमांक शा.रे.प/२०१९-२०/चार/१०५** **दिनांक :- ०६.०२.२०२०**

प्रति,
सर्व केंद्र प्रमुख / मुख्याध्यापक / प्राचार्य,
शासकीय रेखाकला परीक्षा – २०१९.

विषय :- शासकीय रेखाकला परीक्षा – २०१९.
निकाल पडताळणीबाबत.
संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक शारेप/२०१९-२०/चार/०४०,
दिनांक १४.०१.२०२०.
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक शारेप/२०१९-२०/चार/०२३०,
दिनांक ०१.०२.२०२०.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ चा निकाल दिनांक २०.०१.२०२० रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर निकालाच्या अनुषंगाने आपल्या व सहभागी शाळेच्या विद्यार्थ्यांचे निकाल पडताळणी करावयाचे आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांची माहिती केंद्र प्रमुखांना देण्यात आलेल्या लॉगइन व पासवर्ड नुसार निकाल पडताळणीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने www.doa.org.in व www.doa.onlineuniv.in या संकेतस्थळावर दिनांक २७.०२.२०२० पर्यंतच भरता येईल.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षेच्या निकाल पडताळणीची फी एक रक्कमी चलान पध्दतीने नजीकच्या भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २४.०२.२०२० ते २९.०२.२०२० पर्यंत भरणा करता येईल. फी भरणा केल्यानंतर पुन्हा पडताळणीसाठी अर्ज करता येणार नाही.

दिनांक २७.०२.२०२० पर्यंत ज्या केंद्रांनी निकाल पडताळणीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरले गेले नाही. अशा संबंधित केंद्रावर पडताळणीसाठी अर्ज प्राप्त झाले नाही असे समजण्यात येईल. व त्यानंतर कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

(नागेश म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रत,
निवड नस्ती.